क्र. साप्रवि/गट-८(स.व का.)/सा.आ/
११७(क)/म.भत्ता/न.क्र.५६३/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
प्लाट क्र. १ सहावा मजला, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.

<u>सुधारपत्र क्रमांक ३० दिनांक ६-६-२००२</u>
(सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दि.३१.३.८६ करिता)

विषय :- म.रा.वि.मंडळाच्या कर्मचा-यांना दि. १.४.२००२ पासून पुढे ४४.५०% दराने द्यावयाच्या महागाई भत्याबाबत.

संदर्भ :- स.सा.आ.क्र. ११७(क) दि. ३१.३.१९८६ चे सुधारपत्र क्र. २९ दि. २.२.२००२.

-----------

१) सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दि.३१.३.१९८६ चे सुधारपत्र क्र.२९ दिनांक २.२.२००२ अन्वये दिनांक १.१०.२००१ पासून शासनाच्या धर्तीवर मंडळ कर्मचा-यांना ४१.५०% दराने महागाई भत्ता लागू केलेला आहे.

२) महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र. वित्त विभाग क्र.मभवा - ११०२/प्र.क्रं.६/सेवा-९ दिनांक १५.१.२००२ अन्वये शासनाच्या सर्व कर्मचा-यांना दि.१.४.२००२ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ४१.५० % ऐवजी ४४.५० % या सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे. त्यास अनुसरून म.रा.वि.मंडळाच्या कर्मचा-यांना दि.१.४.२००२ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ४१.५० % ऐवजी ४४.५० % या दराने महागाई भत्ता मंजूर करणे आवश्यक आहे.

३) शासनाच्या धर्तीवर मंडळ कर्मचा यांना महागाई भत्ता देण्यासंदर्भात मंडळाने निर्णय क्र. ८५८ दि.१५.१.२००१ अन्वये सचिव, तांत्रिक सदस्य (नि.),तांत्रिक सदस्य (पा.व वि.) व लेखा सदस्य यांच्याशी विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी मा.अध्यक्ष यांना अधिकार प्रदान केले आहेत. त्यास अनुसरून मा.अध्यक्ष यांनी लेखा सदस्य, तांत्रिक सदस्य (पा.व वि.), तांत्रिक सदस्य (नि) व सचिव यांच्याशी विचार विनिमय करून मंडळ कर्मचा-यांना दि.१.४.२००२ पासून वेतनश्रेणीमधील मूळ वेतनाच्या ४४.५०% या दराने महागाई भत्ता देण्यास मंजूरी दिली आहे.

४) १ एप्रिल २००२ पासून पुढे सुधारित दराने लागू होणा-या महागाई भत्त्याची रक्कम परिगणित करताना सुधारित वेतनश्रेणीतील निव्वळ मूळ वेतन हिशोबात घ्यावे तथापि "वेतन" अशी व्याख्या करण्यात येणारे विशेष वेतन, प्रतिनियुक्ती भत्ता, विशेष पूरक भत्ता, हेवी ड्यूटी भत्ता (अवजड वाहन भत्ता) इत्यादी भत्ते महागाई भत्त्याचा विचार करताना हिशोबात धरण्यात येवू नयेत.

५) महागाई भत्त्याच्या रकमेचे प्रदान करताना ५० पैसे किंवा त्याहून अधिक पैशात येणारी रक्कम संपूर्ण रुपयात पुर्णांकित करण्यात यावी व ५० पैशांहून कमी येणारी रक्कम दुर्लक्षित करावी.

६) उपदान, अतिकालीक भत्ता, सर्वसाधारण आदेश क्र. ५९(क) दि. २७ जून, १९७० च्या तरतुदीअंतर्गत रजेचे रोखीकरण, सेवाविनियम क्र. ३९(क), आणि सर्वसाधारण आदेश क्रमांक ११४(क) दिनांक २३ ऑगस्ट १९८२ च्या प्रयोजनास्तव, तसेच वेतन व महागाई भत्त्यावर अवलंबून असलेले अन्य कोणतेही प्रदान/वसुली या प्रयोजनास्तव या सुधारपत्राद्वारे लागू होणारा सुधारित दराचा महागाई भत्ता विचारात घ्यावा.

७) सुधारित दरानुसार महागाई भत्त्याचे प्रदान मंडळाच्या सर्व कर्मचा-यांना जून २००२ च्या वेतनातून लागू करण्यात यावे. तसेच १ एप्रिल २००२ ते मे २००२ या दोन महिन्यांची निव्वळ देय थकबाकी देखील माहे जून २००२ च्या वेतनासोबत देण्यात यावी.

८) १ एप्रिल २००२ रोजी किंवा त्यानंतर एका कार्यालयातून दुस-या कार्यालयात बदली झालेल्या कर्मचा-यांना १ एप्रिल २००२ पासून जुन्या कार्यालयातून मुक्त केलेल्या तारखेपर्यंतची सुधारित दराने द्यावयाची महागाई भत्त्याची थकबाकीची रक्कम देताना १ जून २००२ रोजी ते ज्या कार्यालयात काम करीत आहेत त्या कार्यालयाने द्यावी. १ जून २००२ पूर्वी बदलीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता कार्यमुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांची थकबाकी बदली झालेल्या ठिकाणीच अदा करण्यात यावी.

९) संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी महागाई भत्त्याच्या थकबाकी प्रदानासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी श्री.एम.पी.बढीये, सह मुख्य लेखा अधिकारी (अर्थपाय विभाग), हाँगकाँग बँक बिल्डींग, ४था माळा, मुंबई-४०० ०२३ यांच्याकडे त्वरीत करावी.

हे आदेश कार्यव्ययी आस्थापने वरील कर्मचा-यांनाही लागू होतील.

संचालक (कार्मिक वर्ग) ५/६

प्रत,

प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता, तत्सम व त्यावरील दर्जाच्या अधिका-यांपर्यंत माहितीसाठी.